# इतिहास लेखनातील सबाल्टर्न विचार प्रवाह

शिंदे संदिप शिवाजीराव
संशोधक विद्यार्थी
श्री गुरूबुध्दी स्वामी महाविद्यालय, पूर्णा

जागतिक इतिहास लेखनातील विचार व सिद्धांतामुळे भारतीय इतिहास लेखन प्रभावित झाले आहे. आधुनिक इतिहास लेखनामध्ये वेगवेगळे विचार प्रवाह निर्माण झाले आहेत. प्रत्येक इतिहासकारांची घडलेल्या घटनेकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पाहण्याची वृत्ती असते? यातूनच इतिहास लेखनाचे वेगवेगळे वैचारिक प्रवाह निर्माण झाले. जागतिक इतिहास लेखनामध्ये कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचे खूप महत्त्व आहे. इतिहासात घडणाऱ्या घटना आर्थिक प्रेरणेने घडत असतात. आहे रे वर्ग नाही रे वर्गाचे आर्थिक शोषण करतो. असे मत कार्ल मार्क्सनी प्रतिपादन केले. यामुळे मार्क्सवाद इतिहासकार इतिहासात घडलेल्या प्रत्येक घटनेकडे आर्थिक ष्टीकोनातून पाहू लागले. घडलेल्या घटने मागील आर्थिक दृष्टीकोनातून पाहू लागले. घडलेल्या घटनेमागील आर्थिक कारणे शोधण्याचा प्रयत्न करु लागली. यातून मार्क्सवाद इतिहास लेखन प्रवाह निर्माण झाला. इतिहास लेखनामध्ये पौर्वात्यवादी इतिहास लेखन, वसाहतवादी इतिहास लेखन, राष्ट्रवादी इतिहास लेखन, ॲनल स्कुलचे सर्वांगीन, सर्वकष, संपूर्ण इतिहास लेखन आणि सबाल्टर्न इतिहास लेखन असे वैचारीक लेखन प्रवाह अस्तित्वामध्ये आहेत. या इतिहास लेखनातील विचार प्रवाहांना वेगवेगळ्या विचारांची बैठक आहेत. पण मार्क्सने सुरु केलेल्या मार्क्सवाद इतिहास लेखनामध्ये अनेक सुधारणा होऊन नवमार्क्सवादी ऐतिहासिक लेखनाला सुरूवात झाली. यात ॲन्टेनिओ ग्रामची नावाच्या नवमार्क्सवादी विचारवंताने महत्वाची भूमिका बजावली आहे. ग्रामचीने मार्क्सच्या विचारांचा बदलेल्या जागतिक परिस्थितीशी अन्वयार्थ लावला. आर्थिक शोषणाबरोबर सर्वांगीण शोषण व प्रभूत्वाच्या संकल्पनेवर भर दिला. आर्थिक व्यवहाराने समाजाला दिशा मिळत असली तरी सामाजिक परिवर्तनामध्ये संस्कृती सुध्दा तेवढाच महत्वाचा घटक आहे. समाजाला संस्कृती, गती व दिशा देण्याचे काम करते असे मत ग्रामची यांनी व्यक्त केले.

**ग्रामचीचा हेजिमनी सिध्दात :**

प्रत्येक ऐतिहासिक कालखंडामध्ये सत्ताधारी वर्ग समाजावर आपले प्रभुत्व ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. सत्ताधारी व भौतिकदृष्ट्या समाजावर वर्चस्व निर्माण करतोच पण बौध्दिक व वैचारिक दृष्ट्या सुध्दा वर्चस्व निर्माण करतो. म्हणजेच सत्ताधारी वर्ग आपल्या प्रभूत्वाखालील राज्यामध्ये काही बुध्दीवादी विचारवंताना हाताशी धरून आपल्या राज्यसत्तेला पोषक व अनुकूल विचारांची प्रेरणी करण्यासाठी प्रोत्साहन देतो. या सत्ताधारी विचारांचा सामान्य जनतेवर एवढा प्रभाव निर्माण केला जातो की, सामान्य जनतेला वैचारिक गुलामगीरीची जाणीव होऊ दिली जात नाही. ग्रामची आपल्या हेजिमनी सिध्दांतामध्ये प्रतिपादन करतो की, सत्ताधारी वर्ग समाजावर प्रभूत्व टिकवण्यासाठी दोन मार्गाचा अवलंब करतो. पहिला मार्ग सत्ता, शक्तीच्या माध्यमातून दमन



Co-ordinator
PRINCIPAL

करण्याचा मार्ग होय. तर दुसरा मार्ग संमती व मान्यतेचा असतो. या मार्गातून शिसव, धर्म, साहित्य, सामाजिक संस्था इ.च्या माध्यमातून सत्तेला पोषक विचार मांडले जातात. ती विचार मूल्य समाजामध्ये रूजविली जातात. गुलामाला गुलामीची जाणीव होऊ दिली जात नाही. सत्ता टिकवण्यासाठी दोन्ही शासनाचा अवलंब केला जातो. या हेजिमनी सिध्दाता संदर्भात शांता कोठेकर म्हणतात की, ''शास्ता वर्ग आपले नियंत्रण कसे कायम ठेवतो. या संबंधात ग्रामची वर्चस्व व प्रभुत्व असे दोन भिन्न शब्द वापरतो. दमन मार्गानी कायदा, दंण्डयंत्रणा, पोलीस यंत्रण इत्यादिनी वर्चस्व स्थापित केले जाते, तर अंकीतांच्या बौध्दीक मानसिक व सांस्कृतिक जाणिवांना सोयीस्करपणे प्रभावीत करून आपल्या शासनाला त्यांची मान्यता मिळविली जाते.'' म्हणजेच ग्रामचीच्या मते शासक वर्ग भौतिक व वैचारीक गुलामगीरी निर्माण करून आपली सत्ता कायम टिकवण्याचा प्रयत्न करत असतो.

**ग्रामचीचा 'सबाल्टर्न' विचार :**

'हेजिमनी' सिध्दांतामध्ये ग्रामची 'सबाल्टर्न' संज्ञेचा वापर करतो. सबाल्टर्न हा शब्द इटालीयन लष्करातील खालच्या स्तरातील सैनिकासाठी वापरला जातो. ग्रामची हा लढाई लढणाऱ्या सामान्य सैनिकाचा विचार करतो. लढाईमध्ये लढणारे सामान्य सैनिक असतात. पण विजय मात्र नेतृत्व करणाऱ्या सेनापतीच्या नावाने नोंदवला जातो. म्हणून ग्रामची म्हणतो प्रत्येक क्रांती व चळवळी मध्ये सक्रीयपणे लढणाऱ्या व सहभाग घेणाऱ्या सर्वसामान्यांचा इतिहास लिहला गेला पाहिजे. नेतृत्वाचा नाही तर सर्व सामान्य, शोषीत, अंकीत, जनवादिंलोकांचा इतिहास लिहला गेला पाहिजे. नेतृत्व करणाऱ्या नेत्यापेक्षा सामान्य जनतेच्या सहभागाला व कार्याला इतिहासकारांनी जगासमोर मांडले पाहिजे. याच विचारातून सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाची निर्मिती झाली.

**भारतीय इतिहासकारांचा 'सबाल्टर्न' विचार :**

ग्रामचीच्या विचाराने अनेक भारतीय इतिहासक प्रभावित झाले. त्यांनी भारतीय शोषीत, अंकीत, जनवादी लोकांचा इतिहास जगासमोर मांडण्यासाठी प्रयत्न केले. या प्रयत्नातून सबाल्टर्नचा अभ्यास करण्यासाठी Centre of South Asian Cultural Studies या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सर्वसामान्याचा सत्य इतिहास शोधण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाऊ लागले. या संस्थेच्या स्थापनेत डॉ. रणजीत गुहांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी ठरवून सबाल्टर्न इतिहास लेखनाला सुरूवात केली. इ.स. १९८२ मध्ये डॉ. गुहांनी 'सबाल्टर्न स्टडीज' नावाचा ग्रंथ संपादीत केला. या ग्रंथाच्या प्रस्तावने मध्ये सबाल्टर्न इतिहास लेखनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आज पर्यंतचा इतिहास अभिजनांनी अभिजनांचा लिहिला आहे. याचा वा वाचक सुध्दा अभिजन वर्ग आहे. म्हणून सर्व सामान्य जनतेच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले गेले. पण खरा इतिहास सामान्यांचा आहे. शोषीतांचा आहे. तो इतिहास जगासमोर मांडणे आवश्यक आहे. डॉ. गुहा ग्रामचीच्या विचाराने प्रभावित झाले आहेत. सबाल्टर्न इतिहास लेखनामधील बहूसंख्य इतिहासकार हे मार्क्सवादी इतिहासकार आहेत. या लेखनात आर्थिक व्यवहारापेक्षा अभिजन वर्गाने सर्वसामान्य शोषीत, दलित, अंकीत लोकांच्या सर्वांगीन शोषणावर भर दिला आहे.



Co-ordinator
Estd.1993
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

यात अभिजन वर्ग व शोषीत वर्ग असे वर्गीकरण करण्यात आले आहे. या संदर्भात इतिहासकार देवेरो विजय म्हणतात की, ''इतिहास लेखन को स्थापित परंपराओं की कमीयों से बचने के लिए सबाल्टर्न''. ''अध्ययन के प्रतिपादक रणजीत गुहाने मख्यत: दो प्रकारके नए प्रयोगों पर जोर दिया है। एक तो यह एक भारतीय समाज को एक समरूप समाज या प्रतियोगी गठबंधनों के जमघट या बने बनाए सामाजिक वर्गों एवं उत्पादन संबंधो के माध्यम से देखने का सुझाव दिया है''. सबाल्टर्न मधील अभिजन ही संज्ञा प्रभूत्व गाजवणाऱ्या शोषीकांना वापरली आहे. म्हणून सबाल्टर्न मध्ये अभिजन व शोषीत वर्ग आहेत. भारतामधील सबाल्टर्न विचार प्रसारित करण्याचे श्रेय डॉ. रणजीत गुहा यांना द्यावे लागते. याच बरोबर डॉ. शहिद अमिन व सुमित सरकार यांनी सुध्दा सबाल्टर्न ऐतिहासिक लेखन प्रवाह म्हणून स्वीकारला आहे. अभिजनाकडून शोषला गेलेला सर्व सामान्य व त्याचा इतिहास जगासमोर मांडला आहे.

**सबाल्टर्नची वैचारिक भूमिका :**

डॉ. रणजीत गुहांनी 'सबाल्टर्न स्टडीज' मध्ये सबाल्टर्नची वैचारिक भूमिका स्पष्ट केली आहे. अभिजनांनी अभिजनांसाठी इतिहास लिहिला आहे. म्हणून तो अभिजन केंद्री झाला आहे. भारतीय चळवळीचे नेतृत्व अभिजन वर्गाने केले. त्याच अभिजन वर्गाचा इतिहास लिहिला गेला. पण स्वातंत्र्य चळवळीत अनेक लहान गट व सर्व सामान्य दलित, आदिवासी यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले. इतिहासकारांनी जनसामान्याला निर्बुध्द, आंधळी, नेत्याच्या पाठीमागे चालणारी संबोधले आहे. पण हे सत्य नाही. शेतकरी, कामगार महिला, आदिवासी, दलित इ.च्या सक्रीय सहभागामध्ये अंतस्त प्रेरणा व विचार शक्ती होती. याकडे इतिहासकारांनी दुर्लक्ष केले. आज पर्यंतचा इतिहास अभिजनांचा इतिहास आहे. तो इतिहास एकांगी व पक्षपाती आहे. या संदर्भात शांता कोठेकर म्हणतात, ''आजवरच्या इतिहासकरांनी लिहिलेला इतिहास एकांगी आहे, पक्षपाती आहे, वास्तवाचे दर्शन न घडविणारा व म्हणून अनैतिहासिक आहे. समाजाच्या निम्न स्तरावरील गटांना, जन समुदांना त्यांच्या इतिहासांतील वाजवी स्थानापासून ह्या इतिहासाने वंचित ठेवले आहे. ही उणीव भरून काढणे हे 'सबाल्टर्न' इतिहास प्रवाहाचे उद्दिष्ट आहे.''

सबाल्टर्न इतिहासकारांनी शेतकरी, कामगार, महिला, आदिवासी, व दलित वर्गाच्या इतिहासावर लक्ष केंद्रीत केले आहे. याची वेगळी वैचारिक भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रामुख्याने सबाल्टर्न इतिहासकार आदिवासी इतिहासावर लक्ष केंद्रीत नाहीत. तर त्या मागे आर्थिक कारणाबरोबर इंग्रजांची सामाजिक व सांस्कृतिक धोरणे कारणीभूत होती. असे मत नोंदवले आहे. सबाल्टर्न इतिहास लेखनामुळे दुर्लक्षीत घटकांना न्याय मिळेल. पण या घटकांच्या इतिहास लेखनासाठी आवश्यक साधने उपलब्ध नाहीत. म्हणून सर्व सामान्य जनतेचा इतिहास लिहिणे अवघड आहे. कारण जन सामान्याच्या लढ्यात नोंदी लिखित मिळणे अशक्य आहे. या नोंदीमध्ये सुध्दा काही मोजक्याच नेत्याची नावे येतात. सबाल्टर्न इतिहासकारांनी अभिज इतिहासकारावर टीका केली असली तरी सबाल्टर्न इतिहासकार विदेशात बसून कोणत्या साधनाच्या आधारावर सबाल्टर्न इतिहास लेखन करतील अशी टिका केली जाते.



Co-ordinator
IQAC